# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


MERC/ADM/RTI/068/2019/**441** Dt. 30.07.2019

प्रति,
श्री. जफर शरीफ शेख इब्राहिम,
प्लॉट नं. २५/A/५, शिवाजीनगर,
प्रियादर्शनी नगर, जफरी इंग्लिश स्कुल जवळ,
गोवंडी, मुंबई - ४०००४३.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. २५.०७.२०१९ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. २५.०७.२०१९ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | इस्टिमेट दिया गया उसको रद कर दिया है। सिंगल फेज से थ्री फेज केबल पास नहीं किया जा रहा है अदानी इलेक्ट्रीसिटी अधिकारी नया मिटर देना बंद कर दिया है। सिंगल फेज से थ्री फेज केबल नहीं दिया जा रहा है। हमारी अर्जी को रद कर दिया है। अदानी इलेक्ट्रीसिटी साहेब बोलते है हम को उपर के अधिकारी मना कर दिया है। MERC के नियम के अनुसार मिटर देना है। लेकिन अदानी इलेक्ट्रीसिटी अधिकारी साहेब आपनी मन मानी कर रहे है। तिलक नगर ऑफिसर प्रोग्रेस डिपार्टमेन्ट से लेकर जनरल मॅनेजर तक। | आपणांस आवश्यक असलेली माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही.<br>माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रकरण 1 मधील 2 (च) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.<br>आपणांस नेमके कोणते दस्तावेज हवेत याचा बोध होत नाही. त्यानुसार आपण माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रकरण 1 मधील 2 (च) नुसार माहितीची मागणी करावी जेणेकरुन आपणांस योग्य ती माहिती उपलब्ध करुन देणे सोयीचे होईल. |

| | | |
|---|---|---|
| | | तसेच आपण विचारलेली माहिती हि प्रश्नार्थक स्वरूपाची आहे. त्यानुसार सदर माहिती संदर्भात अपेक्षित उत्तर देणे जन माहिती अधिकाराच्या क्षेत्रात येत नाही. माहिती अधिकार कायद्याखाली नागरिकांना जी माहिती साधन स्वरूपात उपलब्ध होऊ शकते अशी माहिती मागण्याचा अधिकार आहे. त्यामुळे ज्या प्रश्नांची उत्तरे साधन स्वरूपात उपलब्ध नाही, त्या प्रश्नांची उत्तरे देणे अपेक्षित नाही. **(एच. के. बन्सल वि. एमटीएनएल, अपील क्र. पीबीए/06/155, दि. 25.09.2006)** |

माहिती अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19(1) अन्वये श्री. अनिलकुमार उके, संचालक (विधी) अतिरिक्त कार्यभार /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत, पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर 1, 13 वा मजला, कफ परेड, मुंबई - 400005. टेलिफोन नं. 022-22163964/65/69 **Email: anilkumar.ukey@merc.gov.in**

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी